**सं.फौ.ख.क्र. ९२१/२०२३**
**सरकार वि. स्वप्नील ठाकरे**
**नि. क्र. २५**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ५ चे शपथेवर बयान सुरु</u>**

माझे नाव :- रमेश बाबाराव गोलाईत,
माझे वय :- ४८ वर्ष,
माझा व्यवसाय :- चालक,
राहणार :- मोखड, ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती.

**सरकारी अभियोक्ता खंडारे यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, सरकारी साक्षीदार हजर. आरोपी हजर व त्याचे वकील हजर. सबब, कलम ३०९(२) प्रोव्हीजो ४ अन्वये सरतपास वगळण्यात आला. साक्षीदाराला साक्ष देण्यास सांगण्यात आले. साक्षीदार सांगतो की,**

मी आरोपीला ओळखत नाही. घटनेबाबत मला काहीही माहित नाही. मयत सुरेश तायडे यांना मी ओळखतो. ते आमच्या कृषी उत्पन्न बाजार समितीसमोरील पेट्रोल पंपावर चौकीदार म्हणुन कामावर होते. घटनास्थळी मी जात असतांना मला मयत सुरेश तायडे हे बेशुद्ध अवस्थेत पडुन असलेले दिसले. त्यानंतर मी, प्रमोद कंठाळे व दिपक गोलाईत त्यांना घेवुन नांदगाव खंडेश्वर येथील सरकारी दवाखान्यात गेलो. तेथे त्यांच्या घरचे लोकं आल्यानंतर आम्ही दवाखान्यातुन निघुन आलो. पोलीसांनी माझे बयाण २-३ दिवसांनंतर घेतले होते. कोणत्या गाडीने अपघात झाला होता, हे मला माहित नाही. याव्यतिरीक्त मला काहीही सांगायचे नाही.

**<u>आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास ॲड. ए. एस. बावनकुळे वकील यांचे मार्फत</u>**
**<u>उलटतपास नाकारला.</u>**
**पुर्नःतपास काही नाही.**

दिनांक – १०.०७.२०२५

सा.वा.दा.ब.अ.क.के.

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2025.07.10 16:54:21 +0530

**(छाया शा. मेहरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती.
न्यायालय क्र. २

श्रवणोत्तर स्विकृत,

CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Digitally signed by CHHAYA SHAMKUMAR MEHARE
Date: 2025.07.10 16:54:24 +0530

**(छाया शा. मेहरे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती.
न्यायालय क्र. २